# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक १० वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ मे २०१२ पाने १६ किंमत २० रूपये


## टॅक्सच्या रुपाने सामान्य माणसांचे रक्त पिणारे सरकार !




## नाच करे बंदर और माल खाये मदारी !



## आता शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घेणार ..

## १५० शब्दात अर्ज घबाड मारणाऱ्या लबाडांची चाल !

*माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !*

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
google site swarajlokandolan
: Blog :
subhashbaswekar blog

## संपादकीय...........

## "इंग्रजी शिक्षणसम्राटांच्या कानाखाली सर्वोच्च न्यायालाचा आवाज"

स्वातंत्र्यानंतर हिंदूस्थान हा देश दोन भागात विभागला गेला.यात एक भाग आहे इंडिया आणि दुसरा भाग आहे भारत ! भारतीय अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश टाकणारे कृतिशील विचारवंत आणि शेतकरी आंदोलनाला नवा अन्वयार्थ देणारे नेते शरद जोशी यांनी हा जेव्हा सिद्धातं मांडला तेव्हा अनेकांनी भूवया उंचावल्या.परंतु आता भारत विरूद्ध इंडिया हा समाजसंघर्ष जागोजागी पहायला मिळत आहे.

सन २००९ मध्ये जेव्हा शिक्षणाचा अधिकार हा कायदा केंद्र सरकारने मंजूर केला तेव्हा भारतातील गरीब मुले सन्मानाने जगण्याच्या हक्कापासून वंचीत राहू नयेत.म्हणून त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हाच मूळ उद्देश होता.कोणत्याही मुलांना घराजवळच्या शाळेत हक्काने व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे.हे नैसर्गिक आहे.कारण शिक्षण हा काही अर्थशास्त्रीय निकष लावून चालविण्याचा धंदा नाही आहे.दर्जेदार शिक्षण हा जन्मजात मानवी हक्क आहे आणि तो घटनेने मान्य केलेला बालहक्क असल्याने प्रत्येक शिक्षण संस्थेला आपल्या घराजवळील गरीब मुलांना शाळेत प्रवेश दिलाच पाहिजे.अशी तरतूद शिक्षण अधिकार कायद्यात झाल्याने आता धारावीच्या झोपडपट्टीतील मुले पाच पैसे सुद्धा फिस न भरता जर बॉम्बे स्कॉटिश या वार्षीक पाच रूपये फिस असणाऱ्या धनंवताच्या मुलासोबत ए बी सी डी गिरवू लागतील.असे चित्र निर्माण झाले.परंतु या निर्णयाच्या विरोधात इंग्रजी माध्यमातील बडया शिक्षण संस्था न्यायालयात गेल्या. वर्षाला लाखो रूपये फीस भरणाऱ्या नव श्रीमंताच्या गुबगुबीत बाळांसोबत आम्ही झोपडपट्टीतील फाटक्या लोकांच्या शेंबडया पोरांना सोबत घेवून शिकवणार नाहीत असा पावित्रा या मंडळीनी घेतला.

परंतु सर्वोच्च न्यायालयाने या बडया इंग्रजी शिक्षण संस्था चालकांच्या कानाखाली आवाज काढला.शाळा चालविणे म्हणजे तुमचे तथाकथीत क्लब नव्हे. हे शिक्षणाचे मंदिर सर्वांसाठी खुले पाहिजे.एकूण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात गरीबांची २५ टक्के मुलांना शाळेत प्रवेश द्यावाच लागेल असा निर्णय दिला.हे इंग्रजी शाळा चालविणारे बहुसंख्य लोक फार बदमाष व चतूर आहेत.ते न्यायालाच्या आदेशाला धाब्यावर बसवतील.तेव्हा सजग नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी या आदेशाचेपालन होत की नाही यावर लक्ष ठेवले पाहिजे.

एखादे यंत्र ५० सामान्य माणसांचे काम सहज करू शकते परंतु असामान्य माणसाचे काम कोणतेही यंत्र करू शकत नाही.

# आम्ही घाम गाळून कर भरतो ते घोटाळ्यातून मलिदा काढतात...

सरकारच्या तिजोरीत जमा होणार प्रत्येक पैसा हा सामान्य माणसांच्या कष्टातून आलेला असतो.उदा हरण द्यायचे तर आपण मोबाईल रिचार्ज करतो.१०० रूपयाच्या रिचार्ज केला की ९० रूपये टॉक टाईम मिळतो.मग उरलेले १० रूपये कोठे जातात.ते जातात सरकारच्या तिजोरीत.आपण ७० रूपयाचे एक लिटर पेट्राल

गाडीत टाकतो.तेल कंपन्याना त्यातील फक्त ३२ रूपये मिळतात.एका लिटरमागे केंद्र व राज्य सरकारचे मिळून प्रतीलिटर ३८ रूपये टॅक्स लावलेला आहे.तो सरळ सरकारच्या तिजोरीत जमा होतो.याच प्रमाणे अगदी रस्त्यावरील भिकाऱ्याने जरी ६ रूपयाचा वडा -पाव जरी खाल्ला तरी त्यात बेसन,तेल यावरील विक्री कराच्या रूपाने एक-दीड रूपया सरकारच्या तिजोरीत जमा झालेले असतात.केंद्र व राज्य शासन व स्थानिक स्वराज संस्था असे सगळे सरकारी घटक मिळून सामान्य माणसांच्या विविध व्यवहारावर विविध कर लावून जनतेकडून अब्जावधी रूपये गाळा करीत असतात. विक्रीकर,आयकर,सेवाकर,महसूल,मुद्रांक शुल्क,वाहन कर,टोल नाके, जकात अशा विविध तऱ्हेने सामान्य माणसांच्या खिशाला सरकार कात्री लावत असते.सरकार नावाची



यंत्रणा सगळा पैसा सामान्य माणसांकडूनच गोळा करते.परंतु जमा झालेला पैसा कोठे,किती, व कसा खर्च करायचा हे मात्र सामान्य माणसाला कधीच विचारीत नाही.सरकारची तिजोरी खऱ्या अर्थाने सामान्य माणसांच्या मालकीची आहे.तिजोरी जरी सामान्य माणसांच्या मालकीची असली तरी त्या तिजोरीतील पैसे कसे ,केव्हा व कोठे खर्च करायचे हे लोकप्रतिनिधी नावाचे दिवाणजी ठरविणार असे अजब नियम ठरविले गेले.आणि येथेच सामान्य माणसांच्या लूटीची व्यवस्था तयार झाली.लोकशाहीचा मुखवटा घातलेले लूटतंत्र निर्माण झाले.गेली पन्नास वर्षे हे लूटतंत्र अधिकाधिक प्रभावी होत आहे व सामान्य माणसांचा आवाज मात्र अधिकाधिक क्षीण होत चालला आहे.

लोकप्रिय असणाऱ्याकडे गुणवत्ता असतेच असे नाही.

# आम्ही भारतीय लोक आमचे अधिकार आता आम्हीच वापरणारआमचे प्रतिनिधी नव्हे

हे सरकार सामान्य माणसांचे रक्त, अश्रू व घाम पीत आहे.दिल्लीत नियोजन आयोगाच्या बैठकीमध्ये नियोजन आयोगावरील शहाणे अर्थतज्ज्ञ चहा एक कपाचे ४० रूपयाप्रमाणे डोळे झाकून बील देतात.आणि देशातील सामान्य माणसाने जर रोज ३२ रूपये कमाई केली तर नियोजन आयोगाच्या मते तो सामान्य माणूस सरकारच्या कोणत्याही गरीबासाठीच्या सवलतीसाठी पात्र राहत नाही.कारण आमचे सरकार म्हणते की ३२ रूपये रोज कमाविणारा माणूस या देशात श्रीमंत ठरतो.आणि लाखो रूपयांचो मानधन,पगारी,रेल्वे व विमान प्रवासात सवलत व भाडेसूट कार्यालय,पीए, अन्य कर्मचारी यांच्या पगारी व भत्ते घेणारे खासदार संसदेत आपल्या पगारी वाढविण्यासाठी मात्र दहा मिनिटात ठराव मंजूर करून पगारी व भत्ते वाढवितात.गेल्या काही महिन्यापूर्वी खासदारांनी आपला पगार पाच पट वाढविला तेव्हा ३२ रूपये रोज कमविणाऱ्यांची त्यांना आठवणही झाली नाही.

सरकारी पैशाची बेसुमार उधळपट्टी, सरकारी खर्चात प्रचंड दलाली व भ्रष्टाचार व वाढती महागाई असे काही प्रमुख प्रश्न आ वासून उभे आहेत.गेल्या साठ वर्षात लोकशाहीच्या नावाखाली लोकप्रतिनिधीनी प्रचंड अशी घाण करून ठेवली आहे.त्यामुळे लोकशाहीला पर्याय म्हणून लोकसहभाग शाही आणावी लागेन.आधिकार ग्रामसभा व वार्डसभा यांना अलोकांच्या खिशातून कर रूपाने गोळा झालेली रक्कम कोठे,केव्हा,कशासाठी व कशी खर्च करायची याचा असला पाहिजे.लोकांच्या खिशातून सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधीना पगार व भत्ते मिळतात.त्यामुळे लोकसेवकावर हे थेट लोकांचा सामुहिक निर्णय बंधनकारक असला पाहिजे.त्यात्या भागातील लोकसेवक व सरकारी कर्मचाऱ्यावर त्या त्या भागातील ग्रामसभा व वार्डसभा यांना सामुहिक पणे
शास्ती व समज देण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला पाहिजे.असे झाले नाही तर घोटाळे व भ्रष्टाचार यांच्या अराजकात देशाला उज्ज्वल भवितव्य असणार नाही.

आधिकार ग्रामसभा व वार्डसभा यांना अलोकांच्या खिशातून कर रूपाने गोळा झालेली रक्कम कोठे,केव्हा,कशासाठी व कशी खर्च करायची याचा असला पाहिजे.लोकांच्या खिशातून सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधीना पगार व भत्ते मिळतात.त्यामुळे लोकसेवकावर हे थेट लोकांचा सामुहिक निर्णय बंधनकारक असला पाहिजे.

- सुभाष बसवेकर

एखादी गोष्ट मिळविण्यासाठी मनाची तयारी असली की इतर सर्व अडथळे नक्कीच दूर होणारे असतात.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी,
तहसील कार्यालय / प्रांत कार्यालय
ता---------/ जि-----------

१) अर्जदाराचे नांव - ---------------------------------------
२ ) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :-------------------------------------
३ ) माहितीचा विषय - आपल्या तहसील / प्रांत कार्यालयातून माती /वाळू उत्खननासाठी आलेल्या अर्जाची व दिलेल्या परवान्यांची माहिती मिळणे बाबत
४ ) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (एप्रील २०११ ते मार्च २०१२)

अ) आपल्या कार्यालय क्षेत्रात उपरोक्त कालावधीत माती /वाळू उपस्यासाठी एकूण किती ठेकेदारांना अर्जदारांना परवाने देण्यात आले ? त्यांची नावे व पत्ते द्यावेत तसेच प्रत्येक परवानाधारक माती उपसा ठेकेदारांच्या माती उपसा साईट ची पत्ते व ठिकाण यांची माहिती द्यावी

ब) प्रत्येक परवाना दिलेल्या अर्ज दारांनी ठेकेदारांना माती /वाळू उपस्यासाठी त्यांना दिलेला कलावधी, प्रत्येक परवाना धारक ठेकेदाराने किती ब्रॉस माती उपसा केली यांची माहिती द्यावी.
वाळू व माती उपसा व मोजणीचे मोजमापाचे अन्य निकष व प्रमाण असतील तर त्या उपलब्ध प्रमाणातील माहिती द्यावी .

क) उपरोक्त कालावधीत प्रत्येक वाळू /माती ठेकेदारांनी किती रॉयल्टी भरली. प्रत्येक ठेकेदारांनी भरलेल्या रॉयल्टीची एकूण रक्कम याचा तपशील द्यावा.

ड ) परवाना धारक माती व वाळू उपसाकरणाऱ्या ठेकेदारांसाठी रॉयल्टीचे काय निकष आहेत.यासंबंधीचे शासकीय पत्रक, जीआर, किंवा तत्सम उपलब्ध कागदपत्राची छायांकीत प्रत द्यावी

ई ) वरील अर्थिक वर्षात परवानगी शिवाय किंवा परवानगीमध्ये दिलेल्या प्रमाणपेक्षा अधिक वाळू /माती उपसा करणाऱ्यावर ,वाळू /माती चोरी करणाऱ्यावर काय कारवाई झाली ?याचा तपशील द्यावा.

ड) ज्या ठिकाणी वाळू /माती खणण व उपसा करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यानी परवानगी दिली आहे.त्या ते ठिकाण ज्या ग्रामपंचायत हद्दीत येते त्या ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामसभेचा वाळू /माती उपसण्यासाठीचा ठरावाच्या प्रती द्याव्यात.

५ ) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीशः घेऊन जाईन.
६ ) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :-----------

दिनांक : / /2012 (-------------------)

Mo: -------------------

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

जेव्हा खरे बोलण्यासाठी वाट पाहावी लागत नाही तेव्हाच बोलणे सहज होते -(गुरूदेव रविंद्रनाथ)

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड ☐☐☐☐☐☐

मोबाईल : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई मेल :--------------------

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक -----------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: -----------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-----------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

---

सभासद कोड नंबर ☐ **कार्यालयीन उपयोगासाठी** मासिक वर्गणी नंबर ☐

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक [ / / २०१२ ] मुदत समाप्तीचा दिनांक [ / / २०१३ ]
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये ☐ मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा -----------------------------------------------------------------

भले मोठे पुस्तक शिकविण्यापेक्षा वाचनावर प्रेम कसे करायचे हे शिकविले पाहिजे- (मं.गांधी)

रूपक कथा

# लूटला जाणारा सामान्य शेतकरी गुरूचा सल्ला !

एका गावात एक शेतकरी होता.त्याच्याकडे शेतात काम करण्यासाठी चार कामगार,एक मुकादम व एक सरमुकादम असे एकूण सहा कर्मचारी होते.आता आपल्याकडे शेतात काम करण्यासाठी चार कामगार व त्यांच्यावर देखरेख करणारे दोन मुकादम आहेत.तेव्हा आपले शेत भरभराटीला येईल असे शेतकऱ्याला नेहमी वाटत असे. शेतकऱ्यांचे शेत ही चांगले पिके,भरपूर माल होई.परंतु शेतकरी नेहमीच कंगाल व असहाय्य असाच दिसत असे.सुपीक शेत आहे दिमतीला चार कामगार आहेत. त्या कामगारावर देखरेख करण्यासाठी मुकादम आहे.मुकादमावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरमुकादम आहे.शेतात भरपूर उत्पन्नही होत आहे.तरीही शेतकरी कंगाल का ?याचे कोडे सामान्य शेतकऱ्याला उलगडता येत नव्हते.तो नेहमी आपल्या नशीबावर दोष देवून उद्याच्या आशेवर जगत राही.

एके दिवशी शेतकऱ्याच्या शेतावर एक गुरू आला.शेतकरी आपले गऱ्हाणे त्या गुरू कडे रडत - रडत मांडू लागला.महाराज माझे शेत चांगले पिकते परंतु मी कायम कंगाल व गरीब आहे.यावर काय उपाय करता येईल हे सांगा.गुरूने सांगितले की काही दिवस मी तुझ्या शेताचे निरिक्षण करील नंतर तुला उपाय सांगेन.काही दिवस गुरू शांतपणे शेताचे निरिक्षण करीत राहिला.

नंतर एक दिवशी गुरू ने शेतकऱ्याला जवळ बोलावले व काही प्रश्न विचारले.गुरू म्हणाला मी गेले काही दिवस पाहतो आहे.तुझ्या शेतातील कामगार संथ व टंगळमंगळ करीत काम करतात काही वेळा शेतातील माल कामगारच चोरूनही नेतात?त्यांना तू कामावरून काढून का टाकीत नाहीस?त्यावर शेतकरी आत्मविस्वासपूर्वक म्हणाला, महाराज मी मालक असलो तरी माझ्या शेतावरील कामगारांना नोकरीवरून काढून टाकण्याचे कायदेशीर अधिकार मला नाहीत.मी मालक आहे परंतु कामगारांना अरे जरा नीट काम करा असे सांगण्याचा सुद्धा मला अधिकार नाही.मागे मी त्यांना नीट काम करा म्हणून खडसावले तर त्यांनी सरकारी कामात अडथळा आणला म्हणून माझ्यावर पोलीस केस केली.तीन दिवसाची सजा भोगून मी बाहेर आलो. माझ्या कामगारांना नोकरीवरून काढून टाकण्याचे कायदेशीर अधिकार माझ्या शेतावरील सरमुकादम यांच्याकडे आहेत.कामगार काम करीत नसतील,प्रसंगी चोऱ्या करीत असतील तरीही मी केवळ मुकादमाकडे किंवा सरमुकादमाकडे तक्रार करू शकतो.हे पहा मी कामगारांच्या तक्रारीचे दहा

> या कथेतील शेतकऱ्याची जी आवस्था आहे ती या देशातील १०० कोटी सामान्य नागरिकांची आवस्था आहे.आम्ही या देशाचे मालक असूनही मालक म्हणून कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत.चलाख कायदे करून आमचे अधिकार लोकसेवकांनी बळकावले आहेत.ते परत मिळविल्याशिवाय खरी लोकशाही येणारनाही

रोज केलेल्या थोड्या-थोड्या प्रयत्नांची बेरीज म्हणजे यश.

# लूटला जाणारा सामान्य शेतकरी गुरूचा सल्ला !

/बारा अर्ज केले आहेत.पहा त्यांच्या या प्रती.असे म्हणून शेतकऱ्याने अर्जाच्या प्रती गुरूच्या समोर फडकावल्या.तक्रारी करून काहीच उपयोग नाही.कारण सरमुकादम कोणावरच कारवाई करीत नाही.कामगार चोरीचा वाटा मुकादम व सरमुकादमाला देतात.तसेच सरमुकादमही शेतातील माल,माती,पिके व चारा यांच्यात घोटाळा करीत राहतो.शेतकरी निराश होत म्हणाला.

मग तू सरमुकादम का बदलत नाहीस ? गुरू ने खोचक प्रश्न विचारला त्यावर शेतकऱ्याने झटकन उत्तर दिले ,सरमुकादम बदलण्याची संधी मला पाच वर्षातून एकदा मिळते.जरी सरमुकादम बदलला तरी एक सापनाथ तर दुसरा नागनाथ दोघेही आळीपाळीने मला लूटत राहतात.

एवढेच कशाला महाराज शेतकरी पुढे म्हणाला शेतात कोणते बियाणे लावायचे ? त्याची मशागत करायची की नाही ?बियाण्याला पाणी पाजायचे की नाही ?याचे सगळे अधिकार मुकादम व सरमुकादम यांच्याकडे आहेत.शेत सुकून चालले आहे त्याला पाणी पाजा असे सांगण्यासाठी मला मुकादम व सरमुकादम यांचे पाय धरावे लागतात.प्रसंगी त्यांना मला लाच देवून शेताला पाणी पाजावे लागते.गेल्या ६५ वर्षापासून जसे या शेताचे आम्ही मालक झालो तेव्हा पासून माझे आजोबा,वडील व मी गेल्या तीन पिढया आम्ही मालक असूनही मुकादमाचे पाय धरून जगत आहोत हे जगणे आता असहाय्य झाले आहे.महाराज उपाय सांगा शेतकरी कळवळून म्हणाला.

मग तू सरमुकादम का बदलत नाहीस ? गुरू ने खोचक प्रश्न विचारला त्यावर शेतकऱ्याने झटकन उत्तर दिले ,सरमुकादम बदलण्याची संधी मला पाच वर्षातून एकदा मिळते.जरी सरमुकादम बदलला तरी एक सापनाथ तर दुसरा नागनाथ दोघेही आळीपाळीने मला लूटत राहतात.

यावर गुरूने शांतपूर्वक सल्ला दिला की हे शेतकरी राजा,तू जरी मालक असलास तरी तुझ्या राज्यात शेतासंबधी निर्णय व सरमुकादमाचे अधिकार अधिनियम १९४७ हा जो कायदा आहे.तो कायदा जो पर्यंत राहिल जो पर्यंत तू अशाच लूटला जाशील.यावर उपाय म्हणून शेतासंबधी मालक शेतकऱ्याचे निर्णय व अंमलबजावणी अधिकार अधिनियम २०१२ हा नवा कायदा लागू कर.मुकादम व सरमुकादमाकडेचे शेतासंबधीचे सर्व अधिकार काढून तू स्वत:च्या हातात घे.तरच तुला सुखाचे दिवस येतील असे सांगून गुरू पुढील प्रवासाला निघून गेला.

स्वातंत्र्य मिळण्याची गोष्ट नाही, ती मिळविण्याची गोष्ट आहे.(सुभाषचंद्र बोस)

रोकठोक मत

सुभाष बसवेकर

सरकारी अधिकाऱ्यांनी नेहमी लक्षात ठेवावे की स्वच्छ व लोकाभिमुख कार्य करणाऱ्या ज्याच्यावर कसलाही डाग नाही अशा सरकारी अधिकाऱ्यांना माहिती अधिकारच काय जगातला कोणताही कायद्याचा गैरवापर केला तरी ब्लॅकमेल करताच येणार नाही सज्जनावर कधीच दूर्जनाची काळी जादू चालत नाही.त्यामुळे जे सरकारी अधिकारी सत्ताधिश स्वच्छ व पारदर्शक आहेत त्यांनी माहिती अधिकार कायदयाकडे नकारात्मक व उदासिन वृत्तीने न पाहता.आपल्या चारित्र्याला सिद्ध करणारी ही एक कसोटी आहे असे मानावे.माझे कार्यालय माझे काम सर्वांसाठी खुले आहे.या पहा अशी वृत्ती ठेवली तर अशा अधिकाऱ्यांना माहिती अधिकार हा कायदा जाचक वाटणारच नाही.

# आरटीआय ब्लॅकमेलिंग खरे काय खोटे काय ?

मला काही दिवसापूर्वी मोबाईल आला.समोर एक सरकारी अधिकारी बोलत होते. त्यांनी पहिली आर्डरच सोडली, आपण छापता ते नागरिक अधिकार मासिक बंद करा. कारण तुम्ही मासिकातूनच नमूना अर्ज छापता,त्याचा उपयोग करून तथाकथित माहिती अधिकार कार्यकर्ते आम्हाला त्रास देतात.प्रसंगी ब्लॅकमेल करतात.पैसे उकळतात आम्हाला सरकारी कामे सोडून माहिती अधिकारातून मागे लागलेले लचांड सोडवित बसावे लागते.या अधिकाऱ्याची भाषा आणि आवेश पाहता माहिती अधिकार कायदा हा राष्ट्रघातक आहे अणि लोकसेवकांना लोकांनी माहिती मागणे हा या देशात गुन्हा आहे.असेच प्रतीत होत होते.

त्यांचा आवेश पाहता त्यांचा मी सरळ व गंभीरपणे प्रतिवाद करणे निव्वळच बाळबोध ठरले असते.मी त्यांना मी म्हणालो की देशातील सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार तुम्ही सरकारी अधिकारी संपवून दाखवा,ज्या दिवशी भ्रष्टाचार संपेन त्याच दिवशी मी मासिक बंद करतो.दुसरे तुम्ही कायद्याचे रक्षक व कायद्याच्या चौकटीला बांधलेले आहात. माहिती अधिकाराचा वापर करून तुम्हाला ब्लॅकमेल करणाऱ्या,पैसे उकळणाऱ्या तथाकथित कार्यकर्त्यांवर खूशाल कायदेशीर कारवाई करा.अशा कायदेशीर कारवाईला माझा पहिला पाठिंबा असेन.परंतु सुक्याबरोबर ओले जाळू नका.आजही शेकडो कार्यकर्ते प्रशासन स्वच्छ व भ्रष्टमुक्त व्हावे म्हणूनच माहिती अधिकार कायद्याचा अतिशय प्रभावीपणे व निडपणे वापर करीत आहेत. मी त्यांना पुढे शांतपणे समजावून सांगितले की एकतर बहुतांश सरकारी अधिकारी कर्मचारी कार्यालयात लाच खातात,पैसे खायला मिळावेत म्हणून लोकांची कामे रखडवत ठेवतात.अशा प्रकारे पहिल्यांदा अधिकारीच ब्लॅकमेलिंगच करत नसतात काय ? मग अगर चोर घरसे किसीने चोरी की तो वो चोरी नही होती हा फिल्मी डायलॉग आपणास माहितच असेन.या डॉयलॉगचे मला मुळीच समर्थन करायचे नाही परंतु करावे तसे भरावे ही हा नियतीचा कायदा आपण मानला काय? अन् न मानला काय? नियती तिचे काम चोख बजावीत राहते हे त्रिवार सत्य आहे. आपण उघड पाप करायचे व माहिती अधिकाऱ्याच्या चष्म्यातून कोणी पाहू लागले की पाहणाऱ्यावर ,जाब विचारणाऱ्यावर शिंतोडे उडवायचे.ही पद्धत बंद करा.मी ब्लॅकमेल करणाऱ्या भ्रष्ट आरटीआय कार्यकर्त्यांना कधीच पाठिंशी घालणार नाही.आपणही भ्रष्ट अधिकाऱ्यांचे वकीलपत्र घेवूच नका.माहिती अधिकार क्षेत्रात चांगले व स्वच्छ काम करणारे खूप कार्यकर्ते आहेत.तसेच काही पैसे खाणारे,भ्रष्ट कार्यकर्ते ही आहेत.हे मला मान्य आहे.परंतु येथे कोंबडी आधि की अंडे आधी असा वादच नाही.येथे अगोदर सरकारी अधिकारी भ्रष्ट असावा लागतो,तरच तरच आरटीआय कार्यकर्त्याला चूकीचे वागण्यासाठी स्पेस मिळते. जर पहिल्या चोराला जर दुसऱ्या चोराने चोरी करताना पाहिले तर चोरलेल्या मालाचे दोघांसाठी दोन हिस्से करण्याशिवाय अन्य काही पर्यायच नसतो.तेरी भी चूप अन् मेरी भी चूप असा येथे मामला असतो.परंतु एक लक्षात ठेवा स्वच्छ व लोकाभिमुख कार्य करणाऱ्या ज्याच्यावर कसलाही डाग नाही अशा सरकारी अधिकाऱ्यांना माहिती अधिकारच काय जगातला कोणताही कायद्याचा गैरवापर केला तरी ब्लॅकमेल करताच येणार नाही .हे आपण कायम लक्षात ठेवले तर अशी तक्रार करण्याची पुन्हा वेळच येणार नाही.

पैशासाठी काम करतो त्यापेक्षा जोआनंदासाठी काम करतो,त्याच्याकडून काम करून घ्या.

# तक्रार कोठे कराल?

सर्व मनोरंजर व टिव्ही वृत्तवाहिन्यावरील
अश्लील कार्यक्रम चूकीची माहिती
देणारे, समाज घातक संदेश देणारे
टिव्ही कार्यक्रम, यांची तक्रार
तक्रार हिंदी किंवा इंग्रजीतूनच करावी

**दी. सेक्रेटरी**
**ब्रॉडकॉस्टींग कटेंन्ट कम्प्लेन कॉन्सिल**
**३०४, तिसरी मंजील अन्सल प्लाझा**
**खेलगांव मार्ग, न्यू दिल्ली ११००४९**
**फोन :०११ ४३७९४४८८**
**फॅक्स : ०११ ४३७९४४५५**
e-mail : ibf@ibfindia.com
website:ibfindia.com

टिव्ही, वर्तमान पत्रे तसेच सर्व
प्रकारच्या प्रसारमाध्यमातून
चूकीचे दावे करणाऱ्या, खोटी
माहिती सांगणाऱ्या अवास्तव
प्रलोभणे दाखवून, व ग्राहकांचा
फसवणूक करणाऱ्या जाहिराती
तक्रार करण्यासाठी. तक्रार
इंग्रजी किंवा हिंदीतून करावी
सेकेटरी जनरल
ॲडव्हरटायझिंग कॉन्सील ऑफइंडिया,
२१७, बॉम्बे मार्केट, ७८ ताडदेव
रोड, मुंबई ४०००३४
फोन :०२२ २३५१६८६३


टिव्ही, वर्तमान पत्रे तसेच सर्व
प्रकारच्या प्रसारमाध्यमातून
चूकीचे दावे करणाऱ्या, खोटी
माहिती सांगणाऱ्या बातम्यासाठी
तक्रार करण्यासाठी. तक्रार
इंग्रजी किंवा हिंदीतून करावी
सेकेटरी जनरल
प्रेस कॉन्सील ऑफ इंडिया,
**सूचना भवन, फेज-५**
**लोधी रोड, न्यू दिल्ली**
**११० ००३**
**फोन :०११ २४३६८७२६**

आपल्या बॅंकेविषयी आपली
काही तक्रार असल्यास
बॅंकेकडून आपली फसवणूक
झाली असल्यास बॅंकीग लोकपाल
अर्थात बॅंकीग ओम्बुडसमॅन यांच्या
लेखी तक्रार करावी
बॅंकीग ओम्बुडसमॅन
रिझर्व बॅंक ऑफ इंडिया
गारमेंट हाउऊस, तिसरी मंजिल
ॲनी बेंझंट रोड, वरळी
मुंबई ४०००१८
फोन :०२२ २४९२४६०७
फॅक्स:०२२ २४९६०९१२

सगळे जग निघून गेल्यावर सुद्धा जो सोबत करतो तोच खरा मित्र !

# १५० शब्दात अर्ज

# घबाड मारणाऱ्या लबाडांची चाल !


Page ..23.. *March - 2012 Issue No. 3 (Vo. 2)*

**THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION (AMENDMENT) RULES, 2012, DT. 16.1.2012**

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th January 2012.

**NOTIFICATION**

**MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION RULES, 2005,**

**No. CRTI./2009/C.R.398/09/VI.**-In exercise of the powers conferred by sub-sections (1) and (2) of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005), the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, as follows, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Right to Information (Amendment) Rules, 2012.

**2.** After rule 3 of the Maharashtra Right to Information Rules, 2005, the following rule shall be inserted, namely:-

"**3A. Request relate only to single subject matter :-** A request in writing for information under section 6 of the Act shall relate to one subject matter and it shall not ordinarily exceed one hundred and fifty words, If an applicant wishes to seek information on more than one subject matter, he shall make separate applications:

Provided that, in case the request made relates to more than one subject matter, the Public Information Officer may respond to the request relating to the first subject matter only and may advice the applicant to make a separate application for each of the other subject matters."

By order and in the name of the Governor of Maharashtra

NANDKUMAR JANTRE,
Secretary to Government

**THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION (2ND AMENDMENT) RULES, 2012, DT. 31.1.2012**

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31ST January 2012.

**NOTIFICATION**

**MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION RULES, 2005,**

**No. CRTI. 2008/CR 356/VI.**-In exercise of the powers conferred by sub-section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and of all other powers enabling in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, namely:-

महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या अगोदर २००३ मध्ये माहितीचा अधिकारी हा कायदा लागू केला होता.महाराष्ट्राच्या कायद्याचा मसुदा समोर ठेवूनच केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा अस्तित्वात आला व लागू झाला.हे क्रेडीट सत्ताधारी नेहमीच घेत आले आहेत.हे राज्य स्वत:ला माहिती अधिकार कायद्याचे जनक म्हणविते.त्याच राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे माहिती अधिकार कायद्याच्या गळा घोटायला निघालेले आहेत.

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असताना राज्य शासनाने गुपचूप कोणतीही सार्वजनिक घोषणा न करता माहिती अधिकार कायद्यामध्ये दुरूस्ती केल्याचे राजपत्रात प्रसिद्ध केले आहे.त्यात असे लिहिले आहे की माहिती अधिकारात अर्ज करताना आता माहिती मागविण्याचा तपशील फक्त दीडशे शब्दातच मांडला पाहिजे.तसेच एक अर्जात एकच विभागाचा विषय असला पाहिजे अशी अट घातली आहे.अर्जाची संख्या कमी व्हावी व अर्जाचा विषय सूटसूटीतपणे अधिकाऱ्यांना कळवा म्हणून हा बदल केल्याचा दावा सनदी अधिकारी करीत आहे.परंतु हे बदल माहिती अधिकार कायद्याच्या मुल तत्वाचाच गळा घोटीत आहे.या बदलाने जनतेला काय फरक पडणार आहे.हेच कळत नाही आता शब्द मर्यादा घातली व राबविली तर लोक एका अर्जाऐवजी अनेक अर्ज करतील व त्याने अर्जाची संख्या कशी कमी होणार हाच प्रश्न उरतोच.

जानेवारी महिन्यातील तारीख टाकलेले हे राजपत्र एप्रील महिन्यात योगायोगाने माहिती आधिकार कार्यकर्त्यांना पहायला मिळाले.कोणत्याही कायद्यात दुरूस्ती करण्यापूर्वी विधानसभेत चर्चा होणे आवश्यक आहे.सर्व जनतेची मते जाणून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे.हे सरकार जेव्हा लोकांना अंधारात ठेवून कायद्या बदलते तेव्हा हे सरकार लोकांना भीत आहे हे च यातून सिद्ध होते. खरे तर विद्यमान मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे नेहमीच माहिती अधिकार कायद्याचे गुणगाण करीत असतात.परतु लबाड सनदी अधिकाऱ्यांना घबाड खाण्यासाठी हा कायदा अडथळा ठरत असून त्यांना हळूहळू हा कायद्या मारून टाकण्याचा कट रचला आहे.परंतु अशा लबाड अधिकाऱ्याना आम्ही सांगू इच्छितो की माहिती अधिकार हा जनतेचा कायदा आहे.जनता हा कायदा डोक्यावर घेवून निरंतर चालणार आहे.तुमचे कोणतेही मनसुभे जनता हाणून पाडेन हे लक्षात ठेवा.

व्यापक ध्येय प्राप्तीच्या प्रवासात मिळालेली तत्कालीन पराभव हा खरा पराभव नसुन तो विजय असतो.

# आता शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घेणार

## मा. अण्णा हजारे यांची घोषणा !

जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी महाराष्ट्र राज्यात प्रभावी व सशक्त लोकआयुक्त कायद्या लागू करावा यासाठी राज्यभर दौरा सुरू केला आहे.अण्णाचा दौरा त्यांच्या गृह अहमदनगर जिल्हयापासून सुरू झाला आहे.

दौऱ्याला आरंभ होण्यापूर्वी प्रसार माध्यमांशी बोलताना अण्णा हजारे म्हणाले की देशापुढे अनेक प्रश्न गंभीर असून शेतकऱ्यांचा प्रश्न त्यात सर्वाधिक गंभीर आहे.शेतकऱ्याची आवस्था नाच करे बंदर और मेहनत खाये मदारी अशी झाली आहे. हे चित्र बदलण्यासाठी व्यापक आंदोलनाची गरज असून कष्ट करणाऱ्या माणसाला देशात स्वाभिमानाने जगावे अशी परिस्थिती राहिलेली नाही.ही खेदाची बाब आहे.

प्रसंगी स्वत: उपाशी राहून देशाचे पोट भरणारा बळीराजा आत्महत्या करतो.तरीही सरकार या प्रश्नाकडे गांर्भीयाने पाहत नाही.आत्महत्या थांबाव्यात म्हणून पंतप्रधानाचे विदर्भाला मिळालेले मदतीचे पॅकेज पांढऱ्या बगळयांनी हाणले. पुढाऱ्यांनी आपल्याच घरात गाई,म्हशी व अन्य माल मारला.सामान्य शेतकरी हतलब व उपाशीच राहिला.या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांनी शेतकऱ्यांचा जगाच्या वेशीवर मांडण्याचा केलेला संकल्प भूमीपूत्रासाठी आशादायी असाच आहे.


# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ

## मासिक नागरिक अधिकार

## स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या

## सर्व उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती

## आता थेट इंटरनेटवरही उपलब्ध

## गुगल सर्च करा

rtimahasangh.weebly.com

google site swarajlokabhiyan

http://subhashbaswekar.blogspot.in/

नागरिक अधिकार
चे ताजे अंक वाचा
माहिती अधिकार
महासंघ महाराष्ट्रातील
सभासदांची व
कार्यकर्त्यांची सर्व
इंत्यूभूत माहिती पहा.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
प्रति, जनमाहिती अधिकारी
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
ता.----------जि.-----------

१) अर्जदाराचे नांव ------------------------------------------
२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :----------------------------------------
३) माहितीचा विषय - आरटीओ पनवेल यांचेकडे स्मार्ट कार्ड सेवा विषयीची माहिती मिळणेबाबत
४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी

१) आपल्या कार्यालयातील स्मार्ट कार्ड सेवा देण्यासाठीच्या कामाचे कंत्राट कोणत्या कंपनीस अथवा कोणत्या ठेकेदारास दिले आहे.सदर कंपनी व अथवा ठेकेदारांचे नाव व पत्ता द्यावा.

२) आपल्या कार्यालयातील स्मार्ट कार्ड सेवा देण्यासाठी नियुक्त केलेला ठेकेदार अथवा कपंनी केव्हा पासून सेवा देत आहे ? त्यांची नियुक्त जाहिर निविदा काढून झाली आहे काय ? असल्यास निविदा केव्हा प्रसिद्ध झाली ? कोणत्या वृतपत्रात व किती तारखेला प्रसिद्ध झाली ? या संबधीचे वृतपत्रांची जाहिरतीची छायांकित प्रत द्यावीृ किती जणांनी निवीदा भरल्या ? निविदांचा तुलनात्मक तक्ता द्यावा.

३) आपल्या कार्यालयात सद्या जे ठेकेदार अथवा कंपनी स्मार्टकार्ड सेवा पुरवीत आहेत त्यांची नियुक्ती होताना त्यांच्याकडून कोणकोणती आवश्यक ती कागदपत्रे घेण्यात आली त्या सर्व कागदपत्राच्या छायांकीत प्रती द्याव्यात

४) ठेकेदाराला प्रती स्मार्ट कार्ड किती रूपये दिले जातात ? स्मार्टकार्ड धारकांकडून किती घेतले जातात

५) परिवहन कार्यालय व सदर ठेकेदार यांच्यात झालेल्या कराराची छायांकित प्रत द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीशः घेऊन जाईन.
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :-----------

दिनांक : / /2012 (------------------)

**Mo: ------------------**

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
तलाठी सज्जा कार्यालय,
-------- ता.---------जि. ------------

१) अर्जदाराचे नांव - ----------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :---------------------------------------

३) माहितीचा विषय - तलाठी सज्जा ---------------यांच्या विषयीचा तपशील माहिती अधिकार कायद्यान्वये मिळणे बाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी

१) तलाठी सज्जा ------ येथील सज्जा मधून सन २०११ मध्ये किती जमीन खरेदी -विक्री प्रकरणाचे फेरफार तसेच जमीन हस्तांतरणांची सातबारावरील नोंद झाली ? जमीन विक्री करणारे आणि जमीन खरेदी दार यांची नावे व पत्ते तसेच खरेदी विक्री व्यवहार झालेल्या जमीनीचे गट नंबर व सर्व्हेनंबर महसूली गावाचे ठिकाण व पत्ता तसेच प्रत्येक खरेदी-विक्री झालेल्या जमीनीचे क्षेत्र हेक्टर आणि आर मध्ये किती होते त्याचा तपशील द्यावा.

२) तलाठी सज्जा ------या सज्जा अंतर्गत सन २०११ मध्ये पर्यंत किती शेतजमीनीच्या प्रकरणांत अकृषी क्षेत्र म्हणून बदल करण्यासाठी तलाठया मार्फत वरीष्ठ महसूली अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव गेले ? असे प्रस्ताव देणाऱ्या जमीनेचे प्रत्येकी क्षेत्र व मालकांची नावे आणि पत्ते द्यावेत. २००९ पासून जून २०११ पर्यंत किती जमीन प्रकरणाचीअकृषी क्षेत्र म्हणून नोंदणी करण्यात आली ? अशा जमीनीचे क्षेत्र गट नंबर सर्व्हे नंबर तसेच महसूली ठिकाण व सदर जमीन मालकांचे नावे तसेच पत्ते द्यावेत

३) तलाठी सज्जातलाठ्यांच्या कार्यक्षेत्रात किती महसूली गावांचा समावेश आहे ? अशा गावाचा यादी द्यावी.

४) तलाठी सज्जा------ येथील तलाठ्यांनी २००९ पासून जून २०११ पर्यंत प्रत्येक वर्षी किती महसूल शासनास जमा करून दिला ? प्रत्येक वर्षाचा तपशील द्यावा.महसूल जमा करण्यासंबंधी वरीष्ठाकडून किती टार्गेट दिले होते काय ? असल्यास सदर टार्गेट लेखी दिले आहे काय ? सदर टार्गेटची सत्यप्रत्य द्यावी ?

५) तलाठी सज्जा ------ येथे सद्या कार्यरत असलेले तलाठी वाजे सज्जा येथे किती दिवसांपासून कार्यरत आहेत ? सद्या त्यांना किती मासिक वेतन मिळते ?

६) ------ येथे सद्या कार्यरत असलेले तलाठी यांची तलाठी म्हणून त्यांची शासनाकडून कधी नियुक्ती झाली त्यांनी नियुक्तीपासून आजपर्यंत कोठे व किती कालवधीसाठी तलाठी आपले कर्त्यव्य बजावले ? ठिकाणे आणि कालावधी याचा तपशील द्यावा. तसेच त्यांच्या सेवापुस्तीकेची सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :-----------

दिनांक : /  / 2012  (-------------------)

Mo: -------------------

**शेवटचे पान ..**
**प्रेरणा**

## फर्क पडता है।

मौंसम बदलता है तो फर्क पडता है
चिडीयाँ चहकती है तो फर्क पडता है
बेटी गोद में आती है तो फर्क पडता है
भूख बडती है, आत्महत्यायें होती है तो फर्क पडता है
आदमी अकेला लडना तय करता है तो फर्क पडता है
आसमान मे बादल छा जाते है तो फर्क पडता है
आंखे देखती है कान सुनते है तो फर्क पडता है
यहा तक की यह सोचने से भीं फर्क पडता है की क्या फर्क पडता है ?
जहॉ भी आदमी है,हवा है,रोशनी है,आसमान है,
अंधेरा है,पहाड है,नदियाँ है,समुद्र है खेत है
पक्षी है,लोग है,आवाजे है,नारे है...
फर्क पडता है,
फर्क पडता है इसलिए
फर्क लाने वाले के साथ लोग खडे होते है
ओर लोग कहने लगते है की
हां ! फर्क पडता है !!

-विष्णु नागर

प्रति,

पोस्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो १२२३५१६१२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781